बँक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक

Marketing and Publicity
Head Office
media@mahabank.co.in; cmmedia@mahabank.co.in

# प्रसिद्धीसाठी

# बँक ऑफ महाराष्ट्रतर्फे सतर्कता सप्ताहाचे आयोजन

**पुणे, 04 नोव्हेंबर 2019:** गेल्या सप्ताहभर बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये विविध कार्यक्रमानी साजरा करण्यात आलेल्या सतर्कता सप्ताहाची समाप्ती 02 नोव्हेंबर रोजी बँकेच्या पुणे स्थित मुख्यालयी करण्यात आली. पुणे शहर पोलीसचे अतिरिक्त आयुक्त श्री अशोक मोराळे कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमास बँकेचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री ए. एस. राजीव, कार्यकारी संचालक श्री ए. सी. राउत आणि मुख्य सतर्कता अधिकारी श्री एल एन रथ यांची विशेष उपस्थिती होती.

श्री राजीव यांनी बँकेमध्ये काम करताना सतर्कतेची संस्कृती अंगी बाणवण्याचे महत्व स्पष्ट केले. ते म्हणाले की प्रत्येक कर्मचारी-अधिकारी सतर्क असायला हवा आणि प्रामाणिकपणाला तसेच सचोटीला वचनबद्ध असायला हवा. प्रत्येकाने भ्रष्टाचाराच्या विरोधातील लढाईस सहाय्य केले पाहिजे. ते पुढे म्हणाले की, नियमांचे पालन करण्याची प्रक्रिया आणि कार्यपद्धती अधिक बळकट करण्याची आवश्यकता आहे.

सतर्कता जागरूकता सप्ताहाच्या आयोजनाची आवश्यकता आणि उद्देश मुख्य सतर्कता अधिकारी श्री एल एन रथ यांनी विषद केला. बँकेच्या शाखा आणि कार्यालयांनी सप्ताहादरम्यान 'प्रामाणिकपणा-एक जीवनशैली' या संकल्पनेवर आधारित घेतलेल्या कार्यक्रमांची माहिती त्यांनी दिली आणि सांगितले की, या संकल्पनेचा प्रसार आणि प्रचार सप्ताहादरम्यान केला गेला. यावेळी आयोजित केलेल्या विविध कार्यक्रमांची व्हिडिओ क्लिप उपस्थित दर्शकांना दाखवण्यात आली.

अतिरिक्त पोलिस आयुक्त श्री अशोक मोराळे यांनी आपल्या भाषणात विचार मांडताना माणसाच्या आयुष्यातील प्रामाणिकपणाचे महत्व स्पष्ट केले.

या सप्ताहाबरोबरच बँकेच्या गृह-सतर्कता पत्रिका "महाव्हिजिल"च्या पहिल्या अंकाचे प्रकाशन यावेळी करण्यात आला. याबरोबरच अद्ययावत सतर्कता मॅन्युयलचेही उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

या सप्ताहाचे आयोजन 28 ऑक्टोबर रोजी करण्यात आले होते आणि विविध क्वीज आणि स्लोगन लेखन स्पर्धा, वर्कशॉप, जागरूकता कार्यक्रम, कर्मचाऱ्यांसाठी स्पर्धा, रॅली, होर्डिंग आणि बॅनर्सचे प्रदर्शन, ग्रामसभांमध्ये जागरुकता कार्यक्रम, विविध शाळा आणि महाविद्यालयांमध्ये 'प्रामाणिकपणा-एक जीवनशैली' या संकल्पनेच्या प्रसिद्धीचे कार्यक्रम, बँकेच्या देशभरातील 32 अंचल कार्यालयांमध्ये स्टाफ आणि सर्वसामान्यद्वारा ई-प्रतिज्ञा आयोजित केली गेली.

यासह बँकेच्या शाखांनी कार्यक्रमाचा एक भाग म्हणून दिनांक 1 नोव्हेंबर 2019 रोजी ग्राहक बैठकीचे आयोजन केले होते. मुख्य कार्यालयामध्ये क्वीज आणि स्लोगन स्पर्धांमधील विजेत्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली.

सप्ताहामध्ये सतर्कता जागरूकता संबंधात बँकेच्या ग्राहकांना ऑनलाईन सत्यनिष्ठा प्रतिज्ञा घेण्यासाठी एसएमएस संदेश पाठविले गेले. ऑनलाईन सत्यनिष्ठा प्रतिज्ञा घेण्यासाठी बँक ऑफ महाराष्ट्रच्या वेबसाइट वर लिंक देण्यात आली होती.

सतर्कता जागरुकता सप्ताहाच्या समाप्ती कार्यक्रमास मुख्य कार्यालयमधील बँकेचे सर्व उच्चपदस्थ, अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते तसेच बँकेचे 32 अंचल कार्यालय व्हिडिओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून जोडले होते. श्रीमती मृदुल जोगळेकर, उप सरव्यवस्थापक सतर्कता विभाग यांच्या आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची समाप्ती झाली.

Marketing and Publicity
Head Office
media@mahabank.co.in; cmmedia@mahabank.co.in

